छोट्या जाहिराती
संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

पाहिजेत

पाहिजेत कंझाट बेसिसवर कंट्रोल पॅनल वायरमन मरोळ अंधेरी (पू) येथे रहणारे २/३ वर्षांचा अनुभव. ऑनलाईन मुलाखत आणि निवड संपर्क - **9820216851** (NC200098)

एअरपोर्ट, बँक, मॉलमध्ये भरती. शिक्षण पाचवी-पदवी. पगार 13500/- - 27,500/- संपर्क- **9867449165** (NCC200097)

प्रिंटिंग प्रेससाठी अनुभवी फॅक्टरी असिस्टंट पाहिजे. बाहुबली प्रिंटर्स - ए-२८. घाटकोपर इंडस्ट्रियल इस्टेट, आर सिटी मॉलजवळ, घाटकोपर (प), फोन - **022-25008810** मोबाइल - **9321955335** (NC200085)

२४ तास घरकामासाठी बाई पाहिजेत **9867136923** (NC200103)

मेट्रोमध्ये त्वरित भरती पगार 22000/- ते 45000/- संपर्क - **8657653155**(NC200100)

Situation Vacant

Required Account Assistant in vasai having well knowledge of Tally ERP9, All voucher entries, GST finalization and GST payment. Contact : **8379994411 / 9987345294** (NCC20096)

फिल्मविषयक

शूटिंग चालू आहे. आर्टिस्ट आणि हेल्पर्स पाहिजेत. मोबाईल - **9892439763, 9619776725** (NCC20097)

कर्जविषयक

श्रीराम फाइनेंस सरकारी योजना अंतर्गत शिक्षा, प्रॉपर्टी, पर्सनल, बिजनेस, आधारकार्ड समस्त लोन घर बैठे १% ब्याज, ५०% छूट (महिलाओ विशेष छूट) धोखेबाजो से सावधान **7042336831** (NCC200087)

लोन लोन लोन!!! मुद्रा फाइनेंस 1,00,000-90 लाख तक लोन घर बैठे पाये, मार्कशीट, प्रॉपर्टी, पर्सनल, आधारकार्ड, एग्रीकल्चर व समस्त लोन 0% ब्याज, 40% छूट, महिलाओ को विशेष छूट 08595882237 (NCC200095)

जनलक्ष्मी फाइनेंस सरकारी योजना अंतर्गत शिक्षा, प्रॉपर्टी, पर्सनल, बिज़नेस, आधारकार्ड समस्त लोन १% ब्याज, ५०% छूट (महिलाओ विशेष छूट) **8533009912 , 9389525534** (NCC200103)

नोकरीविषयक

लॉकडाऊन नंतर आपण तयार आहात का नोकरीसाठी ? BPO & BANKING सेक्टरसाठी Edubridge E-on नोकरी ओरिएंटेड ऑनलाईन प्रेप्रामध्ये सामील व्हा. वय मर्यादा -18 ते 35 www.edubridgeindia.com/eon **7045460063 / 8369198346** नियम व अटी लागू (NCC200095)

विवाहविषयक

वधू पाहिजे- वय ४० ते ४५ विधवा/घटस्फोटीत जातीची अपेक्षा नाही. **9004966282** (NC200096)

वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

मॅनेजर, 'नवाकाळ'

पहिली ते बारावीच्या अभ्यासक्रमात २५ टक्के कपात! शिक्षणमंत्र्यांची घोषणा

■ मुंबई

शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी आज ट्रीटरवर व्हिडीओ शेअर करून पहिली ते बारावीच्या अभ्यासक्रमात २५ टक्के कपात केल्याचा निर्णय जाहीर

केला. या निर्णयामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विध्यार्थ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. तसेच अभ्यासक्रमाची यादी संचालक, राज्य शैक्षणिक व संशोधक परिक्षक यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गायकवाड म्हणाल्या की, ऑनलाइन, टीव्ही आणि इतर माध्यमातून २०२० आणि २१ हे शैक्षणिक वर्ष सुरु केले आहे. प्रत्यक्षात शाळा अजूनही सुरु झालेल्या नाहीत. अशा परिस्थितीत मुलांच्या मनात तणाव आणि दडपण येऊ नये म्हणून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम २५ टक्के कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती गायकवाड यांनी दिली.

प्रसिद्ध कॅनन पावभाजी केंद्रात लाखोंची चोरी

■ मुंबई

मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनस आणि पालिका इमारतीसमोर गेली ४८ वर्षे सुरू असलेल्या कॅनन पावभाजी सेंटरच्या स्टॉलमध्ये चोरी झाली असून चीज, बटर, भांडी, मिक्सर असा लाखोंचा माल चोरीला गेला. कोरोना काळात हा स्टॉल बंद असताना मागच्या जाळीचे दार उचकटून चोर शिरला असावा.

४ व ५ ऑगस्टला अयोध्येत दिवाळी

■ अयोध्या

येत्या ५ ऑगस्ट रोजी अयोध्येतील राम मंदिराचे भूमिपूजन होणार आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज अयोध्येचा दौरा केला आणि त्यांनी प्रभू श्रीरामाचे दर्शनही घेतले. तसेच भूमिपूजनासाठी सुरू असलेल्या तयारींचा आढावाही घेतला. ४ आणि ५ ऑगस्टला दीप प्रज्वलित करून दिवाळी साजरी करतात तसे वातावरण असेल असेही योगी यावेळी म्हणाले.

योगी यांनी मदिराची उभारणी होणारं स्थळ आणि भूमिपूजनाच्या स्थळाचीही पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून काही सूचनाही केल्या. तसेच त्यांनी राम जन्मभूमीच्या ठिकाणी भगवान श्रीरामाची पूजाही केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राममंदिराचं भूमिपूजन केले जाणार आहे. तसेच सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून हा सोहळा पार पाडला जाणार आहे.

कल्याण - डोंबिवली येथे कोविड केंद्र, चाचणी प्रयोगशाळेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

■ ठाणे

कल्याण येथील कोविड चाचणी प्रयोगशाळा आणि कल्याण तसेच डोंबिवली येथील समर्पित कोविड काळजी केंद्रांचे ऑनलाईन उद्घाटन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले.

डोंबिवली पूर्व येथील दावडी गावात कच्छी कडवा पाटीदार समाज, मुंबई यांनी पाटीदार भवनाची प्रशस्त जागा महापालिकेस उपलब्ध करुन दिली असून सदर इमारत ही तळ + ४ मजल्याची आहे. पहिल्या मजल्यावरील सुमारे ५००० स्क्वे.फीट च्या प्रशस्त जागेत ७० बेड त्यापैकी ६० ऑक्सिजन सुविधा असलेले व १० सेमी आयसीयू बेड असणार असून दुस-या मजल्यावर काम करणारेम डॉक्टर्स, त्यांचा रहिवास, रेस्ट रुम, त्यांचे कार्यालय असणार आहे. तिस-या मजल्यावरती ५००० स्के.फीट च्या प्रशस्त जागेत ऑक्सिजन सुविधा असलेले ७० बेड व ४ थ्या मजल्यावर देखील ऑक्सिजन सुविधा असलेले ७० बेड रुग्णांकरीता उपलब्ध असणार आहेत. बेसमेंटमध्ये कैन्टींग सुविधा उपलब्ध असून सीसीटीव्ही कॅमेरे व रुग्णांकरीता उदवाहन देखील पाटीदार समाजाने पुरविले आहे. सदर रुग्णालयात रुग्णांसाठी पंखे, वॉयफाय सिस्टिम तसेच रुग्णांचे तणाव रहीत वातावरणात राहण्यासाठी मंद सुरावटीची व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयात १ रुपी क्लिनीक डॉ. राहुल घुले यांचेमार्फत चालविण्यात येणार असून एकुण २ एमडी फिजीशियन, २५ निवासी डॉक्टर ,५०परिचारिका व ३० हाऊसकिपींगचा स्टाफ रुग्णांचा सेवेसाठी तैनात राहणार आहे.

कल्याण पश्चिम येथील आसरा फाऊंडेशनच्या प्रशस्त जागेत कोव्हिड आरोग्य केंद्र उभे राहत असून त्यामध्ये १०० ऑक्सिजनचे बेड, ८४नार्मल बेड ,१०सेमी आयसीयू बेडची सुविधा रुग्णांसाठी उपलब्ध आहेत. या सेंटर मध्ये १२ डॉक्टरर्स, २० नर्सेस, २० वॉर्ड बॉय आणि फिजीशियन देखील उपलब्ध असतील. कल्याण पश्चिम गौरीपाडा येथे महापालिकेचे स्वत:चे सुसज्ज स्वॅब चाचणी केंद्र पी.पी.पी. तत्वावर क्रण्णा डायग्नोस्टिक यांच्या माध्यमातून तयार होत असून तेथे दरशेज ३००० चाचण्या होवू शकतात. मनपा आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांनी कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका काय उपाययोजना करीत आहे त्याविषयी सांगितले.

मध्य रेल्वेने भारतीय रेल्वेवरील ऑनलाईन प्रशिक्षणाचे एक ॲप सुरू केले

■ मुंबई

मध्य रेल्वेवरील पहिल्या आभासी व्यासपीठावरील स्थायी निगोशिएट मशिनरी (पीएनएम) बैठकीत भारतीय रेल्वेवरील ऑनलाईन प्रशिक्षणाचे एक ॲप सुरू करण्यातआले आहे.

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजीव मित्तल यांनी २४.७.२०२० रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून पहिल्या आभासी व्यासपीठावरील स्थायी तडजोड यंत्रणेच्या (पीएनएम) सभेला संबोधित केले. अपर महाव्यवस्थापक आणि पीएनएमचे उपाध्यक्ष बी. के. दादाभोय हेदेखील आभासी व्यासपीठावर सहभागी झाले होते. डॉ. ए.के. सिन्हा, मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य कर्मचारी अधिकारी यांनी मान्यताप्राप्त युनियन यांच्यासह हि पीएनएम बैठक आयोजित केली होती. आभासी बैठकीला मध्य रेल्वेचे विभाग प्रमुख व सर्व संबंधित विभागीय रेल्वे व्यवस्थापक आपापल्या कार्मिक शाखा प्रमुखांसह हजर होते.

तत्पूर्वी संजीव मित्तल यांनी ई-पडद्याद्वारे 'इंडियन रेलवे ऑनलाईन ट्रेनिंग' या ॲपचा उद्घाटन केले. अँड्रॉइड ॲप व रेल परिवार देख रेख मुहीम यांचे सादरीकरणही देण्यात आले. या ॲपवर सुमारे ५४० पुस्तके, अभ्यासाचे साहित्य आणि १०० व्हिडिओ, महत्त्वाचे वेबसाइट दुवे अपलोड केले गेले आहेत आणि मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली (एचआरएमएस) दुवा प्रदान केला आहे जिथे मानव संसाधन डिजिटलायझेशन उपलब्ध आहे. वेबसाइट लिंक www.irot.in आहे जिथे दर्शक विविध विषयांवरील ऑनलाइन व्याख्यानांना उपस्थित राहू शकतात.

इस्त्रायलचे पंतप्रधान नेत्यांनाहू विरुद्ध आंदोलन

» पान १ वरून

करार करून पंतप्रधानपद मिळविले आहे. नेतन्याहू कोरोना महामारीच्या संकटाचा सामना करण्यात सपशेल अपयशी ठरले आहे. त्यांनी जनतेला वाऱ्यावर सोडले आहे त्यांचे सर्व लक्ष भ्रष्टाचाराच्या आरोपातून मुक्त कसे होता येईल, याकडेच लागलेले आहे. त्यामुळे नेतन्याहू यांचे राज्यकारभाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. इस्त्राएलमध्ये आतापर्यंत ५७,००० कोरोनाग्रस्त रुग्ण सापडले असून आतापर्यंत ४४२ लोकांचा मृत्यू झाला आहे.

विरोधी पक्षांशी करार करून मे महिन्यात नेतन्याहू हे पुन्हा एकदा पंतप्रधान बनले. सलग अकरा वर्षे पंतप्रधानपदी राहण्याचा विक्रम त्यांनी केला आहे. निदान एवढी वर्षे पंतप्रधान पद भोगल्याचर नेतन्याहू हे कोरोना महामारीला अटकाव करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करतील आणि कोरोना महामारी हटविणे हाच महत्त्वाचा कार्यक्रम ठरवतील, असे जनतेला वाटले होते. मात्र आता मित्रपक्षांच्या सरकारमध्ये अंतर्गत राजकीय लाथाळ्या सुरू झाल्या आहेत. त्यामुळे कोरोना महामारीबाबत इस्त्राईल सरकार आपले धोरण बनवू शकलेले नाही. त्यामुळेच जनता त्रस्त आहे आणि ती आता रस्त्यावर उतरली आहे. नेतन्याहू यांनी राजीनामा द्यावा, हीच जनतेची एकमेव मागणी आहे.

गेल्या २४ तासांत देशभरात आढळले ४८,९१६ नवे रुग्ण

■ नवी दिल्ली

देशातील कोरोनाचा प्रकोप सुरूच आहे.गेल्या २४ तासांत देशभरात कोरोनाचे ४८,९१६ नवे रुग्ण आढळून आले आहेत. तर ७५७ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे देशातील एकूण कोरोनाबाधितांची संख्या १३,३६,८६१ इतकी झाली आहे. यापैकी ४,५६,०७१ रुग्णांवर सध्या उपचार सुरु आहेत. तर ८,४९,४३१ जण कोरोनातून पूर्णपणे बरे झाले आहेत. मात्र, आतापर्यंत देशातील ३१,३५८ लोकांचा कोरोनामुळे बळी गेला आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कोरोना रुग्ण असलेले राज्य आहे. काल शुक्रवारी महाराष्ट्रात कोरोनाचे ९,६१५ नवे रुग्ण मिळाले. त्यामुळे महाराष्ट्रातील कोरोनाबाधितांचा एकूण आकडा ३,५७,११७ इतका झाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय वैद्यक संशोधन परिषदेने (आयसीएमआर) मुंबईतील कोरोना चाचण्यांची संख्या वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. चाचण्यांची संख्या वाढल्यास रुग्णांचे प्रमाण काही दिवस वाढेल. पण नंतर दिल्लीप्रमाणे हळुहळू रुग्णांची संख्या कमीदेखील होईल. तसेच मृत्यूदरही कमी होईल, असे आयसीएमआरचे म्हणणे आहे. १ ते २२ जुलै या कालावधीत मुंबईत १,२२,७५९ कोरोना चाचण्या झाल्या. तर दिल्लीत याच काळात ३,१९,५५९ कोरोना चाचण्या करण्यात आल्या आहेत.

देशातील पहिल्या ई-न्यायालयाचे नाशिकमध्ये ऑनलाइन उद्घाटन

■ नाशिक

देशातील पहिले ई-न्यायालय आज नाशिकमध्ये सुरू झाले असून सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचूड आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपंकर दत्ता यांच्या हस्ते या पहिल्या ई-न्यायालयाचे ऑनलाइन उद्घाटन झाले.

१ ऑगस्टपासून या ई-न्यायालयातून प्रत्यक्षात कामकाजाला सुरुवात होणार आहे. जिल्हा सत्र न्यायालय आणि नाशिक बार असोसिएशनने जिल्हा न्यायालयाच्या आवारात ई गव्हर्नन्स केंद्र हा नवीन प्रकल्प साकारण्यात आला आहे. पेपरलेस कोर्ट या संकल्पनेसाठी हे पहिले पाऊल पाहून असून इंटरनेटच्या माध्यमातून कुटुंबही न्यायालयीन प्रकरणाची दखल घेता येणे शक्य होणार आहे. ई फाइलिंगद्वारे प्रकरणाची दखल घेताना असलेली माहिती दोन्ही बाजूचे वकील आणि पक्षकार यांना एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वेळेचीही बचत होणार आहे. परिणामी कामात पारदर्शकता तसेच नागरिकांच्या वेळेतही बचत होणार आहे.

रेल्वे रणजी संघातील माजी क्रिकेटपटूचे निधन

मुंबई - रेल्वे रणजी संघातील माजी क्रिकेटपटू शिराज धरसी यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी लंडनमध्ये निधन झाले. त्यांनी आपल्या वैयक्तिक क्रिकेट कारकीर्दीत ४९ प्रथमश्रेणी सामने खेळले आहेत. १९६५-६६ ते १९७३-७४ या कालावधीत दिवंगत धरसी यांनी ४९ प्रथमश्रेणी सामन्यात २२८८ धावा जमविल्या असून त्यामध्ये ४ शतके आणि १२ अर्धशतकांचा समावेश आहे. मुंबईमध्ये त्यांनी अनेक वेळा स्थानिक क्रिकेटमध्ये आपला सहभाग दर्शविला होता. काही सामन्यांमध्ये त्यांनी सीसीआय आणि जॉली क्रिकेटर्स संघाचे प्रतिनिधित्व केले होते. भारतीय क्रिकेट संघाच्या एका परदेशी दौऱ्यामध्ये त्यांना राखीव खेळाडू म्हणून संधी दिली होती.

ऑगस्ट महिन्यात थिएटर सुरू होणार?

» पान १ वरून

योग्य ते अंतर ठेवले जाईल, मल्टीप्लेस मध्ये फक्त दोनच स्क्रीनवर दोनच चित्रपट दाखविले जातील, चित्रपट प्रदर्शनाच्या काळात वेगवेगळ्या वेळी मध्यांतर ठेवले जाईल, त्यामुळे दोन स्क्रीनचे प्रेक्षक एकत्र येणार नाहीत आणि गर्दी होणार नाही, तर मध्यांतर पंधरा मिनिटांचे किंवा अर्धा तासाचेही असू शकतात, या काळात संपूर्ण चित्रपटगृह तसेच थिएटरच्या लॉबीचा भाग स्वच्छ करता येईल येईल, तसेच जिने व लिफ्टमध्ये सैनीटाययजेशन केले जाईल, रेलिग स्वच्छ केले जातील, प्रेक्षकांनी हातावर सैनिटायझर घेण्यासाठी गर्दी करू नये म्हणून टच स्क्रीन सैनीटायझर मशीन उपलब्ध असतील, दिवसातून अनेक वेळा संपूर्ण चित्रपट गृहे आणि लॉबी व जिने स्वच्छ केले जातील, अशी नियमावली या मल्टिप्लेक्स असोसिएशन ऑफ इंडियाने तयार केली आहे.

ही नियमावली त्यांनी दिल्लीतील पंतप्रधान कार्यालय, निती आयोग, गृहमंत्रालय, माहिती व प्रसारण मंत्रालय, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, अर्थ मंत्रालय, यांना सादर केली आहे. केंद्राकडून या चित्रपटगृहांना ऑगस्ट महिन्यातच चित्रपट दाखविण्याची परवानगी मिळू शकते. संपूर्ण देशामध्ये पीव्हीआर पिक्चर्सचे ८४१ स्क्रीन आहेत. आणि देशातील ७१ शहरांमध्ये १७६ प्रॉपर्टीज आहेत, असे पीव्हीआरचे सीईओ कमल ग्यानचंदानी यांनी सांगितले. श्रीलेकेतही पीव्हीआर पिक्चरची चित्रपटगृहे आहेत. तर आयनॉक्सचे संपूर्ण देशात ६२६ स्क्रीन आहेत. आणि देशातील ६८ शहरांमध्ये १४७ प्रॉपर्टीज आहेत, असे सीईओ आलोक टंडन यांनी सांगितले. तसेच सिनेपोलीसचे देशात ३९० स्क्रीन आहेत. १८ देशांमध्ये सिनेपोलीसच्या प्रॉपर्टीज आहेत.

नगरमध्ये लॉकडाऊनची गरज नाही पालकमंत्री हसन मुश्रीफ यांचे स्पष्टीकरण

■ अहमदनगर

अहमदनगरमध्ये लॉकडाऊनची सध्या कोणतीही गरज नसल्याचे स्पष्टीकरण पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केले. त्यांनी नागरिकांचीच योग्य ती खबरदारी घ्यावी, असा सल्लाही दिला. त्यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तूर्तास तरी अहमदनगर जिल्ह्यात लॉकडाऊन होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

हसन मुश्रीफ यांनी बैठक घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आज अहमदनगर जिल्ह्यातील कोरोना परिस्थितीचा आढावा घेतला. बकरी ईद में बचेंगे, तो मोहरम में नाचेंगे', मुस्लीम बांधवांनी बकरी ईद घरीच साजरा करावा, असे हसन मुश्रीफ म्हणाले. गावगाडा चालू राहण्यासाठी प्रशासकाची नियुक्ती करत आहे. इतकेच नाही तर सध्या ग्रामपंचायत कारभार चालवणं हा छातीवरचा धोंडा असल्याचंही ते म्हणाले.

सांगलीतील इंदिरानगर येथील कंटेन्मेंट झोन नागरिकांनी केला उद्ध्वस्त

■ सांगली

अँटीजेन टेस्टद्वारे तपासणी केलेल्या नागरिकांपैकी २३ जणांचा अहवाल पॉझिटिव्ह आल्याने महानगरपालिका प्रशासनाने काल सायंकाळी शहरातील इंदिरानगर परिसर सील केला होता. मात्र, संपूर्ण इंदिरानगर परिसर सील झाल्याने नागरिकांनी याला जोरदार विरोध केला. आज शनिवारी दुपारी संतप्त नागरिकांनी बॅरिकेट्स आणि पत्रे काढून कंटेन्मेंट झोन उद्धस्त केला. याशिवाय वैद्यकीय तपासणीलाही जोरदार विरोध केला. नागरिकांच्या उद्रेकानंतर पोलिसांनी इंदिरानगर परिसरातील बंदोबस्त वाढवण्यात आला होता.

जिल्ह्यात ग्रामीण भाग वगळता महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायत क्षेत्रांमध्ये लॉकडाऊन सुरू आहे. कोरोनाचा संसर्ग वाढू नये, यासाठी जास्तीतजास्त नागरिकांच्या वैद्यकीय तपासण्या केल्या जात आहेत. काल दुपारी ॲंटिजेन टेस्टद्वारे केलेल्या तपासणीत शहरातील इंदिरानगर परिसरातील २३ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले. एकाच परिसरात एवढ्या मोठ्या संख्येने कोरोनाचे रुग्ण आढळल्याने महानगरपालिका प्रशासनाने तातडीने इंदिरानगर सील करण्याचा निर्णय घेतला. यानुसार काल सायंकाळी इंदिरानगरमध्ये जाणाऱ्या सर्व मार्गावर बॅरिकेट्स आणि पत्रे लावण्यात आले होते. तसेच या परिसरातील नागरिकांना बाहेर जाण्यासाठी निर्बंध घालण्यात आले होते. संपूर्ण इंदिरानगर परिसर सील झाल्याने संतप्त नागरिकांनी आज दुपारी कंटेन्मेंट झोन उद्धस्त केला. संपूर्ण इंदिरानगर सील करण्याऐवजी ज्या गल्लीत रुग्ण आढळले आहेत तेवढीच गल्ली सील करावी, अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, गांव मौजे - गाळा, ता. वसई, जि. पालघर येथील **श्री. डॉमनिक रिहाबर लेमॅथ** यांचे राहते घर (जुना मालमत्ता क्र. ५१०), नवीन मालमत्ता क्र. जीएम०१/एमए०, क्षेत्र ७५० चौ. फूट, वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय, गाळा यांची बाधी येथे सदर मिळकत अतिक्रमण आहे. तरी सदर घर मालमत्ता मिळकत अगदी निर्विवाद बोजाविरहित आहे किंवा नाही या परिप्रेक्ष्यातील सदर प्रकरण आमच्याकडे आमचे अशील गलिवेल नागरी सहकारी पतसंस्था यांनी मोर्गेजीतले आहे. तरी सदर मिळकतीसंबंधाने कोणाहीकडे हितसंबंधाच्या दृष्टीने गहाण, दावा, बक्षीसपत्र, वरिरीत्या हस्तांतरणाच्या दृष्टीने विचिधाव होत असा तोही हरकत घेण्यासाठीचा पुरावा असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखी कायदेशीर पुराव्यासकट आपली हरकत आमचे कार्यालय १२२/१२७, सायन सिमन सोसायटी, पहिला माळा, भायखळा (प.), मु. मुंबई, जि. पालघर येथे सादर केली पाहिजे अन्यथा कोणाची काहीच हरकत नाही व हरकत हक्क असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजून सदर मिळकत अगदी निर्विवाद बोजाविरहित आहे असा दाखला (Clear Title Certificate) देण्यात येईल, ही नोंद घ्यावी.

दि. : २६.०७.२०२०

आपला,
पेन वकील ॲण्ड सलकारिता
ॲड. वेनस किस्पाय पेन

बिहारचे निवडणूक कर्मचारी बुथवर घालणार पीपीई किट

पाटणा - कोरोना संकट आणि पूर संकट दरम्यान बिहार विधानसभा निवडणूक वेळेतच पूर्ण करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. तसेच आयोगाने याबाबत नियमावलीचा आराखडाही तयार केला आहे. यामध्ये निवडणुकीच्या वेळी मतदान कर्मचाऱ्यांना पीपीई किट घालावे लागणार आहे. मतदारांना संसर्ग होऊ नये म्हणून ईव्हीएम मशीनचे बटण दाबण्यासाठी 'ट्रूथ पिक' चा वापर करण्यास सांगितले आहे.

आयोगाचे सचिव एन टी भूटिया यांनी राजकीय दलांकडून ३१ जुलैपर्यंत आराखड्यासंदर्भात सूचना मागविल्या आहेत. त्याआधारे आयोगाकडून नियमावली जारी केली जाईल. आराखड्यानुसार सर्व कर्मचारी आणि निवडणुकीचे काम करणाऱ्या लोकांना मास्क आणि हातमोजे घालणे बंधनकारक असणार आहे. सार्वजनिक ठिकाणी, निवडणूक कार्यालय आणि पोलिंग बूथवर सोशल डिस्टॅसिंगचे पालन करावे लागेल.

शिरूर येथे कार आणि ट्रकच्या अपघातात तरुणाचा जागीच मृत्यू

■ शिरूर

शिरूर नजीक बो-हाळ मळा येथे झालेल्या कार आणि ट्रकच्या भीषण अपघातात कारचालक २४ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गणेश बळीराम विखे असे अपघातात मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

शिरूर नजीक बो-हाळे मळा येथे एका हॉटेल जवळ रस्त्यावर असलेले पाणी कारच्या काचेवर पडल्याने कारचालकाचा कारवरील ताबा सुटला आणि कार दुभाजकाला धडकून रस्त्याच्या विरुद्ध दिशेला गेली. त्यावेळी येणाऱ्या ट्रकला या कारची जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात कारचालक तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड

सूचना